# रंगतनु

(रंगांवरील कवितासंग्रह - भाग १)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**रंगतनु** (रंगांवरील कवितासंग्रह - भाग १)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : वैशाख कृ. चतुर्थी, शके १९४६
सोमवार, दि. २७ मे, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-972775-3-5

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

रंग माझ्यासाठी नेहमीच एक अद्भुत अनुभव राहिला आहे. बालपणापासून मला आभाळाचा निळा, झेंडूचा पिवळा, गुलाबाचा लाल, पानांचा हिरवा आणि रात्रीचा काळा रंग मोहवत आला. काळ जसजसा पुढे सरकत गेला, तसतसे हे रंग माझ्या मनात शब्द होऊ लागले, आणि त्या शब्दांतून उमलला 'रंगतनु'.

या संग्रहाच्या निर्मितीमागे एक गूढ प्रेरणा होती रंगांमध्ये लपलेला भावार्थ शोधायचा. आपल्याभोवती असलेले प्रत्येक रंग काहीतरी सांगतात. निसर्गाच्या प्रत्येक छटेत भावना आहेत. प्रेमाचं गुलाबी, विरहाचं करडं, आनंदाचं पिवळं, शांतीचं पांढरं, आणि चिंतनाचं काळं हे सर्व रंग मनाच्या पटलावर रोज उमटतात. मी फक्त ते शब्दांत साठवले.

'रंगतनु' लिहिताना मला जाणवलं की रंग म्हणजे भावनांचं मूर्त स्वरूप. ज्या भावना शब्दांत सांगता येत नाहीत, त्या रंगांतून प्रकटतात. रंगांना शब्द देण्याचा हा प्रयत्न होता. कधी तो सहज उमटला, कधी तो अंतर्मुख झाला. पण प्रत्येक वेळी मला असं वाटलं मी रंगांशी संवाद साधते आहे. या संग्रहातल्या प्रत्येक कवितेच्या मागे एक दृश्य आणि एक मनःस्थिती आहे. कधी ते उन्हात चमकणारं केशरी आभाळ असतं, कधी ढगांच्या निळाईत विरघळणारं मौन, कधी गुलाबाचा लाल स्पर्श, कधी रात्रीचं काळं चिंतन आणि कधी सकाळचं शुद्ध पांढरं शांततेचं दान. कधी मी विचार केला आपल्यात किती रंग आहेत ! आपल्या भावना, आठवणी, वेदना, आनंद सगळं काही रंगांचं रूप घेतं. रडणं निळं, हसणं पिवळं, प्रेम लाल, आणि विरह करडा. मग 'रंगतनु' लिहिणं म्हणजे स्वतःचं मन रंगांत पाहणं होतं. कविता म्हणजे माझ्यासाठी आत्मसंवाद. या संग्रहात मी स्वतःलाच विचारलं – 'मी कोणत्या रंगाची आहे?' आणि उत्तर आलं 'मी सर्व रंगांची आहे.' कारण जीवनात एकाच रंगात जगणं शक्य नाही. प्रत्येक दिवस, प्रत्येक भावना, प्रत्येक अनुभव आपल्याला नव्या रंगाने रंगवतो.

'रंगतनु'मधील प्रत्येक रंग माझ्या जीवनाच्या एखाद्या टप्प्याशी जोडलेला आहे. कधी लाल ऊर्मीने भरलेले दिवस, कधी निळ्या शांततेत हरवलेले क्षण, कधी काळ्या रात्रींत जन्मलेले विचार, तर कधी पांढऱ्या धवल पहाटेचा आत्मशांत गंध. हे रंग फक्त माझ्या बाहेर नाहीत, ते माझ्या आत आहेत. त्यांनी मला वेगवेगळं रूप दिलं, वेगवेगळं दर्शन दिलं. त्यांच्यामुळे मी अधिक संवेदनशील, अधिक जाणिवशील झाले. या कवितांमधून मी प्रत्येक वाचकाला एकच सांगू इच्छिते. आपल्या आयुष्यात कितीही सावल्या असल्या तरी रंग कायम राहतात. फक्त त्यांना पाहण्याचा दृष्टिकोन हवाय. काळ्या रंगातही गूढतेचं सौंदर्य आहे, आणि पांढऱ्या रंगातही निःशब्दतेचं गाणं आहे.

'रंगतनु' म्हणजे माझ्या भावनांचा रंगमंच आहे. या रंगमंचावर प्रत्येक रंगाची भूमिका आहे – कोणी गातं, कोणी शांत राहतं, कोणी उजळतं, तर कोणी झाकून घेतं. पण शेवटी हे सर्व रंग मिळूनच जीवनाचं इंद्रधनुष्य बनवतात. शेवटी मला असंच म्हणावंसं वाटतं –

'रंग हे जगाचं सौंदर्य नाहीत;
ते मनाचं सत्य आहेत.
आणि 'रंगतनु' ही त्या सत्याची काव्यमय कहाणी आहे.'

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

रंग म्हणजे केवळ दृश्याचा घटक नव्हे; तो जीवनाचा आत्मा आहे. निसर्ग, मनुष्य, भावना आणि अस्तित्व या सर्वांमध्ये रंगांची एक गूढ भाषा दडलेली असते. ही भाषा केवळ डोळ्यांनी दिसत नाही; ती मनाने ऐकावी लागते. डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या 'रंगतनु' या काव्यसंग्रहात हाच रंगानुभव कवितेतून प्रकटतो. जिथं प्रत्येक रंग एक जिवंत स्पंदन बनतो, आणि प्रत्येक कविता त्या रंगाचा आत्मस्वर गाते.

'रंगतनु' हा शब्दच स्वतःमध्ये एक अद्भुत रूपक आहे. रंगाने विणलेलं तनु, म्हणजेच देह, पण भावनांनी ओथंबलेलं मन. कवयित्रीसाठी रंग म्हणजे फक्त चित्रकलेचा घटक नाही, तर जीवनाचा श्वास. तिच्या कवितांमधील रंग सृष्टीच्या प्रत्येक कोपऱ्यात शिरलेले आहेत. आभाळात, फुलात, डोळ्यांत, आणि हृदयाच्या नाजूक कप्प्यांत. या संग्रहातला प्रत्येक रंग म्हणजे एका भावविश्वाचा अवतार. लाल म्हणजे उत्कटता, निळा म्हणजे शांतता, पिवळा म्हणजे चैतन्य, हिरवा म्हणजे आशा, काळा म्हणजे चिंतन, तर पांढरा म्हणजे निर्मळता. पण डॉ. मंजूषा यांच्या शब्दात हे रंग केवळ प्रतीक म्हणून राहत नाहीत. ते जीवंत होतात. ते बोलतात, नाचतात, विरतात आणि पुन्हा उमलतात. कवयित्रीने रंगांना जणू मानवी रूप दिलं आहे. लाल तिच्यासाठी प्रेमाच्या धगेसारखा आहे. जो हृदयात धगधगतो, पण जळत नाही. निळा म्हणजे आकाशाचं अंतहीन मन जिथं विचारं उडतात आणि भावनांचं मुक्त आकाश पसरतं. हिरवा तिच्या कवितेत आशेचा अंकुर आहे, तर काळा हा आत्मपरीक्षणाचा आरसा आहे. प्रत्येक रंग तिच्या शब्दांतून एक विचार बनून वाहतो.

'रंगतनु'मधील कवितांचा एक विलक्षण पैलू म्हणजे रंग आणि भावना यांचा संवाद. कवयित्री रंगांचा वापर केवळ दृश्य सजावटीसाठी करत नाही; ती त्यांचा तत्त्वार्थ शोधते. तिच्या कवितांमध्ये रंग म्हणजे मनाच्या छटा आहेत. प्रेम, विरह, आनंद, शांतता, दुःख या सगळ्या भावना ती रंगांमधून सांगते. उदाहरणार्थ, तिच्या

कवितेत पिवळा सूर्यकिरण केवळ सकाळचा रंग नाही; तो आशेचा संकेत आहे. काळं ढगांचं आभाळ केवळ वादळाचं रूप नाही; तो मनाच्या वेदनेचा गहिरा रंग आहे. अशा प्रकारे प्रत्येक रंग तिच्या लेखणीतून भावविश्वाचा नवा अर्थ घेतो. रंगांवर लिहिलेलं हे काव्य म्हणजे केवळ सौंदर्याचा प्रयोग नाही; तो भावनेचा विज्ञान आहे. रंगांच्या मानसशास्त्रात म्हणतात, प्रत्येक रंग मनावर विशिष्ट परिणाम करतो. लाल ऊर्जा देतो, निळा शांत करतो, हिरवा संतुलन आणतो, पांढरा निर्मळता देतो, आणि काळा आत्ममंथन करतो. कवयित्रीने या सर्व परिणामांचा काव्यात्मक वापर केला आहे.

'रंगतनु'मधील काही कविता जणू एकाच वेळी चित्र आणि संगीत दोन्ही आहेत. शब्दांमधील रंगांचे ठसे आपण वाचताना अनुभवतो. कधी कविता कोवळ्या प्रकाशात न्हालेली वाटते, तर कधी संध्याकाळच्या तांबड्या रंगाने दाटलेली. कधी ती निळ्या रात्रीसारखी शांत आहे, तर कधी पावसाळ्याच्या हिरवाईसारखी भरून वाहणारी. या संग्रहाचं वैशिष्ट्य म्हणजे रंग आणि आत्मा यांचं विलयन. 'रंगतनु' ही केवळ रंगांची गोष्ट नाही; ती आत्म्याच्या रंगांची कहाणी आहे. कवयित्रीने स्वतःला रंगांत विलीन केलं आहे, आणि म्हणूनच प्रत्येक कविता तिच्या भावनांचा आरसा आहे. कलेच्या जगात असं म्हणतात – 'रंग बोलत नाहीत, पण ते सांगतात.'

'रंगतनु'मधील प्रत्येक कविता हाच अनुभव देऊन जाते. या संग्रहातील काव्यरचना नितळ, भावस्पर्शी आणि दार्शनिक आहे. कवयित्रीने रंगांच्या प्रतीकातून मानवी मनाच्या विविध अवस्थांचं दर्शन घडवलं आहे. कधी ती रंगांना देवतेप्रमाणे वंदते, कधी मित्रासारखं बोलते, तर कधी स्वतःच रंग बनते.

'रंगतनु' वाचताना जाणवतं हे केवळ निसर्गाचे रंग नाहीत; हे आत्म्याचे रंग आहेत जे दिसत नाहीत; पण जाणवतात. रंग हे इथे फक्त माध्यम आहेत; मूळ गाणं आहे मनाचं! अखेर या प्रस्तावनेत असं म्हणता येईल.

'रंगतनु' हा संग्रह म्हणजे कवयित्रीच्या जीवनचित्राची एक रंगपेटी आहे, ज्यात प्रत्येक कविता एक रंग आहे आणि एकत्र येऊन हे सर्व रंग तिच्या काव्यविश्वाला पूर्णता देतात.

**श्री. स्वप्नील सावरकर**

मुंबई

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | स्वप्नांची फुलपाखरे येती | ... | ११ |
| २) | प्रतिबिंबाला हर्ष असा | ... | १२ |
| ३) | एकदा विचार तू... | ... | १३ |
| ४) | जग उगाच वाटे सुंदर | ... | १४ |
| ५) | पारदर्शी मन वसता | ... | १५ |
| ६) | नववधूची मोहिनी | ... | १६ |
| ७) | एकटेपण हे खासे | ... | १७ |
| ८) | नवीन प्राण हे फुंकावे | ... | १८ |
| ९) | हृदय हे रंगून जाते | ... | १९ |
| १०) | प्राण येती तरारून | ... | २० |
| ११) | तुझी कारागिरी गोड | ... | २१ |
| १२) | झाड अंगणात माझ्या रंग रंग रंग झाले | ... | २२ |
| १३) | रंग अनोखे जपणे की | ... | २३ |
| १४) | जपून ठेवीन स्मृती होळीच्या | ... | २४ |
| १५) | दे तनु मज पुष्पवल्ली | ... | २५ |
| १६) | रंग कोणते मज मनी | ... | २६ |
| १७) | पंखाचा स्पर्शकिनारा | ... | २७ |
| १८) | अशी चैतन्ये पसरून जाती | ... | २८ |
| १९) | रंग गोड हा काळा | ... | २९ |
| २०) | रंग संग मग दंग दंग | ... | ३० |
| २१) | घरट्याची ओढ आहे | ... | ३१ |
| २२) | रंग असावे असेच आता | ... | ३२ |
| २३) | मातीतून विलसावी | ... | ३३ |
| २४) | पडदे गुणी रहावे | ... | ३४ |
| २५) | गुलाब उपवन गुलाबी मळे | ... | ३५ |
| २६) | कृतज्ञ चरणी राहू | ... | ३६ |
| २७) | नव्या कळीचे नवेनवेपण | ... | ३७ |
| २८) | हृदय वाहिले आहे | ... | ३८ |
| २९) | हरित दुलई जी अंथरलेली | ... | ३९ |
| ३०) | दडून बसल्या माशीलाही | ... | ४० |
| ३१) | एक गुलाब जो | ... | ४१ |
| ३२) | वाट कुणाची पाहते धरणी | ... | ४२ |
| ३३) | देव भेटता जन्म सार्थकी | ... | ४३ |
| ३४) | अत्तर फाया मनी राहणे | ... | ४४ |
| ३५) | नवी मंजूषा उघडे | ... | ४५ |
| ३६) | चांदण्यांची ओंजळ | ... | ४६ |
| ३७) | चिंब ओल्या वाटेवरती | ... | ४७ |
| ३८) | श्रीहरी रे श्रीहरी | ... | ४८ |
| ३९) | ती शुभांगी पुष्पिका | ... | ४९ |
| ४०) | कमल ताटव्यांच्या गुलाबी | ... | ५० |
| ४१) | वर्षाराणीचे चित्र मोहक | ... | ५१ |
| ४२) | हात कुणाचे स्वर्णिम झाले असतील | ... | ५२ |

४३) हिंदोळ्यावर कधी सुखाच्या ... ५३
४४) गोकर्णाच्या निळ्या जांभळ्या ... ५४
४५) रंग भरून संगाने ... ५५
४६) गुच्छ मोहिनी ... ५६
४७) ठेव दे देवा अशी ... ५७
४८) गाव तोच रेखावा ... ५८
४९) हातातल्या गुलाबाने ... ५९
५०) सुंदर जीवन सुंदर लोचने ... ६०
५१) मोहित वेळ ही करते ... ६१
५२) जगणे असेच चाले ... ६२
५३) जगणे सुंदर व्हावे ... ६३
५४) इथे विसावती कला ... ६४




## (१)
## स्वप्नांची फुलपाखरे येती

कुठली पुण्ये कशी फळावी
ओंजळीत सुख येताना
नकळत घडते काही ऐसे
कवेत चांदणे घेताना

आकाशातील चंद्र तारका
लुकलूकताना हसतात
फुले सानुली आपसूक हळवी
गंधकोशी मग बसतात

स्वप्नांची फुलपाखरे येती
भावमधुलिका भरण्याला
पहाटवेळी गुंजन खेळी
मनी मोहना स्मरण्याला

आकाशाचे रंग हजारो
पसरून जाती अवकाशी
आणि निशेला जाग रोजची
नक्षत्रांच्या बाहुशी

श्वास मोकळे भरता येतील
दिशा खुल्या दश स्फुरताना
कधी कुणाच्या आठवातुनी
जन्मोजन्मी उरताना

दि.२५/०६/२०२४
सकाळी ०७.५८ वा.



## (२)
## प्रतिबिंबाला हर्ष असा

कंटक भरल्या आयुष्यावर
असे उमलू दे फूल नवे
रंग गुलाबी गुलबक्षीचा
रेशमी त्याचे धागे हवे


मनात उडतील पक्षी किती ते
उंच नभावर मग सत्ता
पंखांमध्ये बळ मिळता मग
आकांक्षावर ये मत्ता

पदतली असतील काटे ढिगभर
कोमलता जर उरी वसे
आत कोंब जो रुजला मग तर
फुलण्या आस ती खरी दिसे

उमलून यावे आतून आपण
मृदुल कोवळे मन असता
काट्यांना तुडवत येताना
काळजातले क्षण बसता

घडते अकल्पित सारे कधीतरी
जन्म कुठे उत्कर्ष कसा
दर्पणासही वाटे अचंबा
प्रतिबिंबाला हर्ष असा

दि.१६/०६/२०२४
सकाळी ०९.४३ वा.



(३)

## एकदा विचार तू....

एकदा विचार तू  दूरच्या नभास त्या
सांग ना खरे तुझे रंग कोणते पुन्हा
का बदलती क्षणक्षणी
हे हेतू काय कोणते
सांग ना रे ढंग तुझे वेगळाले कोणते
एकदा विचार तू.....

जीवनाचे काय हे गुपित सांभाळतो
रंग कोणता पुढे कुणाही कधी ना कळे
जगुनी घ्यायचे खरे लाभते जे सामोरी
त्यातुनी पुढे कसे जायचे ते कळे
एकदा विचार तू.....

आकारही सांगती न राहे काही संगती
आज हा उद्या नि तो तरीही मौज रंगती
धरून काय ठेवणे काय सोडायचे
कोण आता कोण पुन्हा
बसेल संग पंगती
एकदा विचार तू.....

येती मेघ कुठून नि पाहुणे की घरचे ते
रांगा त्यांच्या खालती
की मजले त्यांचे वरचे ते
का उगाच गर्जती भेडसावती कुणा
सोडतात पावसाच्या
कोणत्या कुठे खुणा
एकदा विचार तू.....

सांज असते अंबरी सकाळही दुपारही
गगनी रंग सांगती दूर जाणे फारही
प्रेरणा नवी नवी की उदासी मांडते
भरून ये आभाळाची वाट पाहे दारही
एकदा विचार तू.....

दि.१४/०६/२०२४
सकाळी ०९.५३ वा.



## (४)
## जग उगाच वाटे सुंदर

चाहूल कोणती लागे
का मनात प्रीती जागे
उमलून देई स्वप्नांना
हा वसंत वेडा वागे

फुलवीत जातो तो कळ्यांना
गालावरल्या त्या खळ्यांना
नवजीवन देतो वेडा
सुकलेल्या शुष्क मळ्यांना

आणतो कुठून ते रंग
रंगात प्रेम हो दंग
उधळून देई गंधांना
रती मदनमनाच्या संग

हासतात कलिका धुंद
मग हवाही होते कुंद
छेडते कुणी तेथे का
राधेचा छंद मुकुंद

जग उगाच वाटे सुंदर
मन मस्त उधळते कलंदर
प्रेमाची ताकद बघूनी
प्रणयागरी लहरी निरंतर

दि.१९/०५/२०२४
सकाळी ०७.३९ वा.



## (५)
## पारदर्शी मन वसता

रंगरंगुल्या या पानांच्या
नितळ मनाला पहावे
जे जे दडले अंतरात ते
सहजी उमजून यावे

सुंदरता ती झळकत जाते
पारदर्शी मन वसता
आत बाहेरी नको वेगळे
अलवार भावना असता

रंग सारखे येतील उभरून
आपोआप रंगाने
देठ प्राण हे जोवर जोडून
जीवनरस संगाने

वृक्ष कर्म हे जाणून घ्यावे
कैक जन्माची बीजे
पूर्वसंचिते असतील उत्तम
सत्कर्म इथेही कीजे

उंच नभाने खुणावताना
वाऱ्यावर डोलावे
रोज एकदा त्या आतल्याला
परि सत्य बोलावे

आरपार असण्याचे जेंव्हा
कळेल गमक हे साधे
सुटतील गुंते धागे मोकळे
निष्प्रभ नशिबा प्यादे

दि.१८/०५/२०२४
सकाळी ०८.३५ वा.



## (६)
## नववधूची मोहिनी

सोन हळदीने माखलेली
ही बहाव्याची नवरी
पाहुनी भवताली दिसते
का अशी ती बावरी

रंग कोणी सांडला हा
स्वर्णकांती मोहना
लुभवितो स्वप्नांसवे
का बहावीच्या मना

अंग अंगांवरती पसरे
वर्ख सोन्याचा जसा
अन मुलामा कोणी दिधला
नव सुखाचा हा असा

हासते ती हासते का
मुरक्या मुरक्या लाजते
प्रीत साम्राज्यात नवखी
प्रेम कहाणी गाजते

रंग येतील नवनवे ते
रोज आता जीवनी
नवरोबाच्या मानसीला
नववधूची मोहिनी

दि.१६/०५/२०२४
सकाळी ०८.१८ वा.



## (७)
## एकटेपण हे खासे

मला वाटते एकाकीपण
फक्त माणसा असते
देख एकटा रस्ता इथला
नदी एकाकी असते

जंगल कानन किती विस्तीर्ण
तरी एकटे रहाते
एकटेच ते सरोवर शांत
नभही एकटे पहाते

झाड एकटे कुठेतरी ते
कधी लगडते कधी निष्पर्ण
सप्तरंग कधी इंद्रधनूचे
कधी एकटा वर्ण

गाव एकटे कधी एखादे
दूर देशी वसलेले
कुणीतरी त्या तिथे उदासी
कवटाळून बसलेले

भाव एकटे छाया एकटी
स्वप्नं एकटे भासे
त्याच्याशी बघ जुळण्या नाते
असे एकटेपण हे खासे

दि.१४/०५/२०२४
रात्री ११.४३ वा.



## (८)
## नवीन प्राण हे फुंकावे

घेऊन जा रे तिथे मला तू
उमलून येईल मन
सृष्टी संगे हिरवाईच्या
बनात राहील मन

घर कौलारू साधे असू दे
तुझ्या नि माझ्या स्वप्नीचे
भवताली मग स्वर्ग अवतरे
नंदनवन जणू पृथ्वीचे

रोजरोजची फुले हासरी
रंगामध्ये माखून ती
मला खुणावती न्याहाळ न्याहाळती
हळूच पाहती वाकून ती

पायाखाली हिरवाईची
माया मल्मली अंथरली
तुझी नि माझी प्रीत आगळी
इथेच राजा मंतरली

वरून वाकले डोक्यावरती
सुंदर छत आकाशाचे
डोंगर सारे हिरव्या दुलयीत
रस्ते हळव्या प्रकाशाचे

रोज वाटते नवीन जगणे
नवीन प्राण हे फुंकावे
ओंजळ देते प्रीत फुलांची
हरखून त्यांना हुंगावे

दि. ०९/०५/२०२४
सकाळी ०८.४६ वा.



## (९)
## हृदय हे रंगून जाते

तूही पडला न प्रेमात यांच्या
फुले चिमुकली गोड
रंग एवढे कोण टाकतो
आकारही अजोड

निसर्ग असतो खरा सोबती
सखा आपुला हितकर
मोहक दृश्ये किती साठवून
घ्यावी मनातच सुंदर

स्पर्श कोवळे हरितृणांचे
मल्मल फुलात दडते
मऊशार ही वाटे पालवी
किमया सदैव घडते

असो उदासी अथवा भकासी
क्षणात संपून जाते
नव्या नव्याशा स्वप्नफुलांवर
हृदय हे रंगून जाते

विसरून आपुले आपुलेपण मग
इथे रमावे वाटे
फुले पाकळ्या रंग खुलुनीया
मनी खुशी ही दाटे

दि.०६/०५/२०२४
सकाळी ०९.३७ वा.



## (१०)
## प्राण येती तरारून

असे वाटते रमावे
शांत सृष्टीत कधी ते
एकटेच नको कोणी
रव ऐकावे आधी ते

स्पर्श गारवे जळाचे
चरणांशी रुळताना
जरा भेटावे स्वतःला
स्वतःशी जुळताना

दूर डोंगराशी जावे
उंचावरून जोखावे
खाली धरेची ती खोली
वर अंबर झोकावे

तिथे उगवतो रोज
दिनमणी न चुकता
घ्यावे पाहून तयाला
लावण्य ते न हुकता

आकाशात केशराचे
मळे खुलवतो कोण
रंग टिपून मनाशी
विसावावे क्षण दोन

अशा चैतन्याच्या घ्याव्या
भरभरून त्या गोण्या
आठवाव्या स्मृती पुन्हा
उदासल्या राती कोण्या

जाई मळभ सरून
प्राण येती तरारून
झटकन एकरूप
व्हावे पट ते सारून

दि.१७/०४/२०२४
सकाळी ०६.११ वा.



## (११)
## तुझी कारागिरी गोड

पानापानात कलेचा
दिसतो की हा नमुना
रंग कातरा आकार
देठ घडवितो तू ना

अगणित पाने फुले
अगणित झाडं वेली
कसे गणित मांडावे
कुणी रचना ही केली

आरपार रेषांतून
कधी हसतोस तूच
कळी फुलातून देवा
गोड दिसतोस तूच

माझी मती गुंग होते
ब्रह्मांडची दंग होते
कणकण तुझा आहे
तुझी कृपा संग होते

म्हणूनची नाही कधी
वाटे मनाला निराशा
श्वास घेत राहताना
प्राण हेच तुझी भाषा

रूप सुंदर वाटते
क्षणाक्षणाला भेटते
तुझी कारागिरी गोड
डोळा पारणं फिटते

दि.१५/०४/२०२४
सकाळी ०९.२१ वा.




## (१२)
## झाड अंगणात माझ्या
## रंग रंग रंग झाले

रंग भरले आकाशी, तरुवर पसरले
इंद्रधनू का देवाचे धरणीशी विसरले

झाड अंगणात माझ्या रंग रंग रंग झाले
त्याची खोडे पाने फुले रंग रंग रंग झाले

आज मन पंचमीला रंग होत उधळले
वृंदावनी राधा आणि श्याम रंगरंगाळले

कुठे कुठे रंग कसे सांगू रंग हरिसंग
रंग रंग अंग मन मन दंग असे रंग श्रीरंग

जन्म भरे रंग उमंग सूर रंग गीतरंग
रंग माझा रंग तुझा रंग त्याचा एकरंग

दि.३०/०३/२०२४
रात्री ०८.५९ वा.



## (१३)
## रंग अनोखे जपणे की

धुळवड धुळवड उडली आकाशी
अंगाऱ्याची रक्षा घेऊन
पवित्र पावन होळीमधल्या
खुणा जराश्या अंगी लेऊन

आधी जाळणे जे ना पावन
मनात जे जे असे अमंगल
तेंव्हा खुलतील रंग सुरंगी
वर्ण वाटतील किती सुमंगल

निसर्गातले रंग रंगीले
जगण्यामध्ये आणू या
रंग होळीचे उत्साहाचे
रंग प्रेमाचे जाणू या

गालावरती रंग लावता
खळीत बुडूनी हसतील ते
पक्के होऊन आणि मनाच्या
खोल तळाशी बसतील ते

रंगांमधल्या आठवणींचे
रंग अनोखे जपणे की
दरवर्षीच्या होळीमधले
क्षण सुंदरसे टिपणे की

दि.२५/०३/२०२४
सकाळी ११.५१ वा.




## (१४)
## जपून ठेवीन स्मृती होळीच्या

जाळून टाकू होळीमध्ये
जे जे बिनसले आपुल्यामध्ये
येशील का रे पुन्हा नव्याने
रंग आणु या जगण्यामध्ये

रागद्वेष हे लयास जावो
पवित्र अग्नी पेटून येवो
त्याच्या साक्षी नव्या उमेदी
नवीन सारे घडून जाओ

धुळवड इथली खुणा होळीच्या
खेळून घेऊ मनसोक्त पुन्हा या
रंग अनोखे उमटून येतील
इंद्रधनूचे नवे पुन्हा का

रंगपंचमी हासत येईल
वृंदावनी बघ रास ही रंगेल
राधा असो की तिथे गवळणी
प्रत्येकींचे काळीज दंगेल

एक रंग होऊ दे मनाचा
कधीतरी रे सखया सजणा
दे आळवुनी स्वर स्वर्गीचे
प्रीत खरी लाभू दे या मना

जपून ठेवीन स्मृती होळीच्या
धुळवड सुद्धा जपेन राजा
रंगपंचमी  बुडून जाईल
असे रंग अनमोल दे राजा

दि.२४/०३/२०२४
रात्री १०.४९ वा.



# (१५)
## दे तनु मज पुष्पवल्ली

कुसुम आले उमलुनी
रंगात बोलू लागले
पाकळ्यांच्या हिंदोळ्यावर
सुमन डोलू लागले

इवलुसे जगणे की त्याचे
जीव आहे इवलुसा
इवलुशा स्वप्नात रंगे
श्वास त्याचा इवलुसा

केवढा विश्वास त्याच्या
त्या उमलण्यातुन दिसे
राहणे किती काळ न जाणे
तरी परागातुन हसे

सांज होता मिटून घेते
पापण्या अलवार ते
कोश गंधाळून जाती
मस्त मदनी वार ते

रंग किती अन् कोणते
कोणते आकारही
दे तनु मज पुष्पवल्ली
भावफुले साकार ही

दि.२०/०३/२०२४
सायं. ०६.४५ वा.



## (१६)
## रंग कोणते मज मनी

कसे तुज कळले चित्रकारा
रंग कोणते मज मनी
पाकळ्यांच्या मल्मलीवर
चालते मी यौवनी

वाटते सारेच आहे
रंगभरले भारले
वृक्षवेली पाने सारी
रंगातून साकारले

त्या तिथे उगवून आल्या
स्वप्नवेड्या कोंबुल्या
रंग अंगोपांगी त्यांच्या
आत आशा थांबल्या

उंच उडती पाखरेही
उतरूनी येती घरा
हरखुनी जाती पुन्हा ती
रंगाळी पाहून जरा

सांगते मी आज तुजला
आत माझ्या रंग काही
लपवुनी ठेवू किती मी
लपविणे मज येत नाही

तू तुझ्या रे कुंचल्याने
कागदावर विश्व रेखून
दावीशी मज रंगभरले
नवनवे आयुष्य आखून

दि.१७/०३/२०२४
रात्री १०.३३ वा.




## (१७)
## पंखाचा स्पर्शकिनारा

हलक्या हलक्या मऊशार
पंखाचा  स्पर्शकिनारा
गालावरती सख्या दे फिरवून
अलगद भावपिसारा

रंगमोहिनी मोही पाडते
पुन्हा पुन्हा भुलवुनी
मनमोरणी मनात नाचे
स्वप्नपंख फुलवुनी

क्षण ते सुंदर घे साठवुनी
आठवून सहवासाला
पंख तोच मग असे पुरेसा
गोड मधुर भासाला

नसता जवळी आपण दोघे
पंख जवळी असतो ना
लाडिक साऱ्या खुणा देऊनी
गाली मग हसतो ना

उडतो गिरक्या घेऊन थोडा
झुळूक हवेची येता
रोमरोम उत्फुल्ल तो होतो
अंगी फिरवून देता

दि.१६/०३/२०२४
रात्री ११.५७ वा.



## (१८)
## अशी चैतन्ये पसरून जाती

कुणी न पाहती वनी काननी
उमलून आल्या फुला
ते तर झुलती स्वानंदाचा
आनंदाने झुला

हळूच येते झुळूक गारवी
थंड थंड वाहते
वेलीवरूनी कळी कळुली
वाकून मग पाहते

रंग उमलती सारे सुंदर
खुलवून दे परिसरा
त्यातच येतो लाडिक वाहत
अवखळसा का झरा

मधेच उडती गोड गोडुली
नाचरी फुलपाखरे
वाचून घ्यावी पंखांवरती
रंगमोह अक्षरे

अशी चैतन्ये पसरून जाती
क्षणोक्षणी त्या तिथे
दोन फुले मज मनी उमलती
स्वप्नी रमते मी इथे

दि.१४/०३/२०२४
रात्री ११.२० वा.



## (१९)
## रंग गोड हा काळा

रंग काळा काळा
आई, आपुला रंग का ग काळा?
ढवळे पाणी, आकाश पांढरे
हंस स्वच्छ पांढराळा
आपुला रंग का ग काळा?

बदक पांढरे गोरे गोरे
कोंबडा तसा पांढरा हा बगळा
सारसपक्षी किती ढवळे ते
ढवळा कबुतर मेळा
आपुला रंग का ग काळा?

एखादा पोपट दिसे पांढरा
मोरही दिसतो शुभ्र आगळा
पेंग्विन पुढूनी धवल धवल किती
बघ ना पांढरा गायबगळा
आपुला रंग का ग काळा?


काकाकुआ किती गोरा गोरा
करकोचा ना काळा
समुद्रपक्षी सुंदर ढवळे
ढवळा त्यांचा चाळा
आपुला रंग का ग काळा?

ढग पांढरे चंद्र पांढरा
चांदण्या गोऱ्या ढवळ्या
नदी पांढरी जळ हे शुभ्र
फुले पांढरी तशाच ह्या कळ्या
आपुला रंग का ग काळा?
सांग ना, आपुला रंग का ग काळा?

असू दे आई रंग कसाही
पाठीवरती तुझ्या मी बसलो
आई जवळी आहे म्हणुनी
आनंदाने बघ ग हसलो
रंग छान बघ आपुला काळा
नजर न लागे बाळा

आई, रंग गोड हा काळा

दि.१३/०३/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (२०)
## रंग संग मग दंग दंग

हरवून जाते रंगांमध्ये
किती तुझी ही उदारी
छटा निराळ्या भाव निराळे
धन्य तुझी कलाकारी

हिरव्या हिरव्या रंगामधला
आल्हादी ताजवा
इथे चमकतो रंगरंगुला
मनी कुणी काजवा

रंग फिके मोहवून जाती
गडद भाळवून देती
कधी अंधाऱ्या रातीसुद्धा
रंग चाळवून जाती

रंग संगती कुठून आणतो
अजब सृजनता त्याची
जो तो पाहतो रंग सुरंगी
ह्यासम रंगळी ह्याची

रंग संग मग दंग दंग
मन रंग खेळते छंद
रंग रंग श्रीरंग अभंग
आत्मरंगी जीव बंद

दि.१०/०३/२०२४
दुपारी ०१.०३ वा.



## (२१)
## घरट्याची ओढ आहे

डोळ्यात वाच माझ्या
नजरेतली करारी
घेतो भरून सहजी
पंखातली भरारी

जगण्यातली मजा जी
जगतो मनास भरुनी
उडतो खुलास उंच
आनंद पंख करुनी

चोचीत दाणा पाणी
तो घालतो सुखाने
गातो सुरेल गाणे
मी गोडव्या मुखाने

बसतो निवांत कधीही
डहाळी झुला झुलुनी
रंगात पंख माझे
जाती उगा भुलुनी

नसती मनात चिंता
घरट्याची ओढ आहे
येताच सांजवेळ
परतून जाय पाहे

दि.०५/०३/२०२४
सकाळी ०७.३९ वा.



## (२२)
## रंग असावे असेच आता

रंग असे हे सदा खुलावे
जीवनात माझ्या
तुझ्या पाऊली सुख बहरू दे
प्रियतमा राजा


साऱ्या आशा विसंबलेल्या
आता तुझ्यावरती
सर्वस्व ही तू तूच माझे रे
जीव तुझ्यावरती

झाले समर्पित क्षण मन सारे
तूच स्वप्न झाला
सत्यही तूच नि तूच देवता
प्रेमभाव झाला

असे वाटते सफल जाहले
वाट पाहणे रे
अशक्य आता तुझ्या विना मी
एकटी राहणे रे

रंग असावे असेच आता
नित बहरा आलेले
रोज नव्याने मीलन आणिक
प्रीत प्रहर झालेले

दि.२५/०२/२०२४
रात्री ०९.४३ वा.



## (२३)
## मातीतून विलसावी

स्पर्श वल्लरी भाव सुंदरी
कलिका मनोहारी
पुष्प उमलण्या आधी प्रकटे
निर्मिती ही न्यारी

हृदयमंजिरी पराग कणेरी
जन्म जिथे लपला
सुगंध कोठे इथे तिथे ना
अंगांगी छपला

एकावरती एक परती बघ
कोमलता लपटे
हळव्या सुकोमल भावरचनेचे
पांग असे ते फिटे

रंग कोणते अंग कोणते
संग कोण आहे
श्रीरंगाच्या अंतःकरणी
दंग कोण पाहे

कलिका आजची नांदी फुलाची
मुकुलिता हसावी
देठापासून सुरभी कोश घे
मातीतून विलसावी

दि.२६/०६/२०२४
सकाळी ०७.५५ वा.



## (२४)
## पडदे गुणी रहावे

किती गुड्यांचे पडदे मनाशी
किती रंग झुळझुळे
एक उडे तो दुसरा ओढे
वाऱ्याशी सुळसुळे

बदलत राहती पडद्यामधले
चित्र सदा का असे
आता भासते हे माझे अन
क्षणात परके कसे

लावून घ्यावे हौस हौशीने
पुन्हा पुन्हा पडद्यांना
का सारावे दूर दूर ते
कडेस बघ भिंतींना

उघडून द्याव्या खिडक्या साऱ्या
पडद्यातून झाकल्या
झुळुका हवेच्या श्वासासंगे
ताज्या ताज्या कळ्या

सहज उघडता यावे पडदे
सहज सारता यावे
भावभावनांच्या ह्या कोंदणी
पडदे गुणी रहावे

दि.०६/०७/२०२४
सायं. ०६.०४ वा.



## (२५)
## गुलाब उपवन गुलाबी मळे

गुलाब उपवन गुलाबी मळे
गुलाब फुलले हासत सगळे
चंद्र गुलाबी चांदणेही ते
गुलाबीच भवतालचे खळे

गुलाब रांगांमध्ये गुलाबी
हवा गुलाबी वाहत राही
गुलाबदल ते उमलून येता
गुलाब खुलले गुलशन काही

गंध गुलाबी अत्तरदानी
स्पर्श गुलाबी मंतरलेले
गुलाब येथे गुलाब तेथे
भाग्य गुलाबी अंथरलेले

काट्यांवरती डुलती गुलाब
दुःख सोस बोलती गुलाब
सुख जे हवे ते मिळे कधी
मातीत रुतून घे वदे गुलाब

मनास येई रंग गुलाबी
क्षणाक्षणाला संग गुलाबी
राधा मोहन छंद गुलाबी
प्रेम बहर स्वच्छंद गुलाबी

दि.०७/०७/२०२४
रात्री ०७.१९ वा.



(२६)

## कृतज्ञ चरणी राहू

खडकालाही फुटती पाझर
पायतळी रोपटे
बीजामध्ये दडले काय ते
रंग रूप गोमटे

वर्षा होते चार मास परि
जीवन चाले निरंतर
काय व्यवस्था कोण निर्मितो
कृती त्याची अपरंपर


भूमातेच्या उदरी दडते
बीज गुप्त राहुनी
भाग्य फळावे तसे अंकुरते
कोंब ये डोकावुनी

निर्मळ जल तो देतो बरसून
कृपा त्याची ती जाणू
सतत प्रयासे त्या चरणावर
मनास नमवून आणू

चिंतन त्याचे सतत करावे
फुले उमलता पाहू
कुणा जमेल का किमया त्यासम
कृतज्ञ नेहमी राहू

ईश्वरा, कृतज्ञ चरणी राहू
तुझिया कृतज्ञ चरणी राहू

दि.१३/०७/२०२४
सकाळी ०९.३३ वा.



## (२७)
## नव्या कळीचे नवेनवेपण

काळी माती हिरवी फांदी
कळी कोणती न ठाऊक
उमलून येईल कळेल तेव्हाच
रंग रूप तिचे भावुक

म्हणून फुलविणे जरुरी असते
तसे पोसणे माहीत
असू द्यावी की जाण तयाची
खुणा शोधणे काहीत

काय हवे ते पुरवीत जाता
जीव आकार घेई
पोषक वातावरणामधुनी
असणं साकार होई

श्वास जरा मोकळा तो द्यावा
जरा मोकळ्या वाटा
आपुलकीचा गंध मिळावा
काय करे मग काटा

अंगा अंगावरती ऋतूंची
शाल मऊ पांघरता
आले वादळ तरीही न राही
पाकळीही गांगरता

रोज नव्याने नव्या सकाळी
नवेच होऊन जाणे
नव्या कळीचे नवेनवेपण
सदा नवेले रहाणे

दि.१६/०७/२०२४
रात्री ११.५४ वा.




## (२८)
## हृदय वाहिले आहे

किती रंगशील रंगामध्ये
राधे श्रीरंगाच्या
कथा आपुल्या होतील गाथा
अमर प्रीत संगाच्या


एक छेडिली तार सुराने
धुंद मग्न तू झाली
धावत सखये माझ्यासाठी
आतुरतेने आली

सप्तसुरांच्या सीमा आपुल्या
प्रीतरागिणीला ना
वेणु हसते अधरी बसते
राधाकृष्ण मधुलीला

चंद्र खुलावा तू मी असता
चांदण्यात रोहिणी
कशास मिटशी नयन बोलके
मंजु मधुर मोहिनी

क्षण हे सुंदर मन अपरंपर
हृदय वाहिले आहे
राधा पाहते कृष्ण उरातून
कृष्ण राधेला पाहे

दि.२५/०७/२०२४
सकाळी ११.२९ वा.



## (२९)
## हरित दुलई जी अंथरलेली

हरित दुलई जी अंथरलेली
भुई नटून नटवरली
हलक्या हवेच्या झुळूकेसंगे
फुले सान डवरली

उभ्या उंच तरुतळी मखमली
हिरवाई पसरता
त्यावर छाया गडद सांडते
भान सृष्टी विसरता


आकाशाच्या फिकट निळ्याशा
छत्रीने उघडता
रंगसंगती सुरम्य सुंदर
अवकाशातून घडता

पायवाट काढुनी वाटुली
धुंद चालून जाते
मनात आपुले सूर छेडूनी
गाणे पोपटी गाते

तशात उडती फूलपाखरे
मधु भक्षण करण्याला
गंध सुगंध नि परागकण ते
जीवनात भरण्याला

सजली धजली सृष्टी सुंदर
रूप नवे साजिरे
कसे विसरावे नभ सखयाने
तिचे हास्य गोजिरे

दि.२६/०७/२०२४
सकाळी ०८.४६ वा.



## (३०)
## दडून बसल्या माशीलाही

दडून बसल्या माशीलाही
गंध गुलाबी खुणावे
स्पर्श गुलाबी अत्तरतनुचे
मोद तिचाही दुनावे

कधी न मिळाले इतुके सुंदर
बसण्या आसन तिजला
गलिच्छतेच्या साम्राज्याविन
महाल गुलाबी सजला

तिथली गुंऽऽई गुंऽऽई
नको नकोशी घाणीतली का वाटे
इथे तियेचे मनही नितळसे
गुंजारवास दाटे

म्हणून थोडी दडून बसली
पाकळीत लपताना
आज तिच्या का मनास लाभे
समाधान छपताना

एक वाटले तिला परंतु
रंग गुलाबी यावा
तनास तैसा मनासही तो
अलगद लपटून जावा

माशी शिंकली असे न होवो
नासिकेस ती वदली
आता माशी पंख गुलाबी
घेऊन गगनी चढली

दि.०५/०८/२०२४
सकाळी ०९.४५ वा.



## (३१)
## एक गुलाब जो

गुलाब भिजला दवबिंदूंनी
थरारल्या पाकळ्या
रंग खुलावा इतुका सुंदर
नाजुकशा ग कळ्या

वर्षाराणी भिजवीत जाते
चिंब रानावना
बहर खेळवी ऋतू गंधाचे
भुरळ वेडी मना


जरी काट्यांवर जगणे आहे
पहा गुलाबाचे
हासत रहाणे उमलत जाणे
धुंद गुलाबाचे

हिरव्या कऱ्या पानांवरती
हिरवाई मांडली
अत्तर कुपी ही दरवळलेली
कुणी कधी सांडली

एक गुलाब जो तुझ्या नि माझ्या
काळजात राहिला
किंचित लाजून खळाळलेला
तेंव्हा मी तो पाहिला

तू मी, मी तू, गुलाब संगे
मंद्र चांदणे होते
तुझे नि माझे हृदय जोडले
उधाणलेले होते

दि.१०/०८/२०२४
संध्याकाळी ०५.३४ वा.



## (३२)
## वाट कुणाची पाहते धरणी

पावसातली हिरवळ कवळी
छटा निराळ्या सुंदर
कसे मी रमते त्या रंगातून
मोद मिळे अपरंपर


कुणी निर्मिले रंग अनोखे
बहर बहरुनी येते
वसुंधरा का प्रिया मीलनी
अशी मोहरून येते

अंगावरती हिरवी वसने
हिरवा शालू नेसून
वाट कुणाची पाहते धरणी
सजून धजुनशी बैसून

अंगाखांद्यावरी तियेच्या
प्रेमांकुर रुजताना
प्रियतम वर्षावात सखी
बेधुंद अशी भिजताना

अधरांवरती गीत तियेच्या
आपसूक उमटून येते
भेट अनोखी वर्षा ऋतूची
नयना मिटून घेते
ती नयना मिटून घेते

दि.१२/०८/२०२४
रात्री ११.५७ वा.



## (३३)
## देव भेटता जन्म सार्थकी

मनास माझ्या सदाच वाटे
कुतूहल निर्मात्याचे
कुठून आणतो रंग एवढे
जगण्या कौतुक त्याचे

एक शोधण्या जन्म न पुरतो
तो तरी दशांगुळे उरतो
जरी फाटकी झोळी आपुली
सौंदर्याने भरतो

कुणी केली का अशी कल्पना
रंग छटा त्या निराळ्या
पोत निराळे स्पर्श जाणिवा
मनात उमलाव्या कळ्या

एक देह परी किती अनोखे
प्रत्येकाचे दिसणे
त्याहून कोडे आत मनातील
कसे कुणाचे असणे

उगाच वाटे हात तयाचे
एकदा स्पर्शून पहावे
देव भेटता जन्म सार्थकी
कणकण हर्षुन जावे

दि.१४/०८/२०२४
सकाळी ०७.३२ वा.



## (३४)
## अत्तर फाया मनी राहणे

दरवळ माझा सोनचाफी रे
परिमळ असू दे राऊळी
अंगणातल्या झाडाखाली
ओसरीवरल्या जागुली


सुगंध येईल घरभर सारा
असेल मी की नसेल रे
धुंद क्षणांच्या बरसातीने
कणकण बरसून बसेल रे

पहा तिथे त्या देवळीतल्या
कोपऱ्यात मी दडलेली
आठवेल का तुला सख्या रे
प्रीत सोनेरी घडलेली

हलकी हलकी आठवणींची
झुळुक सोनेरी येताना
सुरभित होईल जीवन सारे
सोनचाफी मी होताना

बघ ना तुजला जमेल का मग
अत्तर बनवून मज ठेवणे
क्षण एकाकी क्षण गजबजले
अत्तर फाया मनी राहणे

दि.१७/०८/२०२४
रात्री ११.५४ वा.



## (३५)
## नवी मंजूषा उघडे

प्रभातकिरणे डोकावली अन्?
लहर चैतन्य उठली
झाडे वेली पाना फुलांच्या
गावी वार्ता कुठली


चला चला की उषःकाल हा
आला आता आला
एक सुरेख हा दिन भेटाया
उत्सुक किती हो झाला

पुन्हा नव्याने श्वासांवरती
हक्क वाटतील आता
क्षणा क्षणांच्या खुणा सापडो
काळ ओलांडू जाता

झुळझुळ झुळझुळ सूर वाहती
हसरे प्रवाह खळखळ
आत उसळते जीवन ऐसे
रुधिर वाहते सळसळ

रंग नव्याने येती बिलगण्या
नवी मंजूषा उघडे
हरखून जावे अशी मधुरशी
पहाट सुंदर उघडे

दि.१९/०८/२०२४
सकाळी ०७.१२ वा.



## (३६)
## चांदण्यांची ओंजळ

उधळून चांदण्यांची
ओंजळ रीती करावी
हृदयात आकाशाची
व्यापकता की भरावी

येतील मेघ दाटुनी
बरसून जाती वा न वा
नुसत्याच फोल गर्जना
पाण्याची चाले वानवा


असले जरी तसेही
सांभाळुनी तयांना
जाते गगन पुढे ते
अदृश्य पायऱ्यांना

येईल चंद्र वेडा
वेडात भारलेला
तेजास वाढवीता
कधी तेज हारलेला

उगवे उषा पहाटे
सांजेस का निशाही
ऐसी नभास चढते
मोहकशी का नशा ही

त्याची तशी ती रूपसी
बदलून रंग येते
आभाळही भरूनी
प्रीतीत दंग होते

दि.२०/०८/२०२४
सकाळी ०९.५३ वा.



## (३७)
## चिंब ओल्या वाटेवरती

चिंब ओल्या वाटेवरती
मोती सांडलेले
बघ दवाचे थेंब चमचम
पल्लवीशी मांडलेले

स्पर्श ओले ओलीत्याचे
मेण वाटे मृत्तिका
गप्प होती जी उधाणली
काळजातून वृत्ती का

झाडे वेली डोलताना
थंड झुळुका वाहती
त्या गवतपात्या लाजुनी
प्रीतरंगी नाहती

डोकावून पाहे सविता
पावसाच्या अंगणी
इंद्रधनूच्या वाकलेल्या
त्या कमानी रंगणी

आज येतो गंध कोठून
मंद धुंद सारखा
त्या फुलांना त्या भुईला
होवो ना कधी पारखा

दि.२२/०८/२०२४
रात्री ११.४८ वा.



## (३८)
## श्रीहरी रे श्रीहरी

श्रीहरी रे श्रीहरी मी
होत जावे बासरी
अधरी श्वासांच्या लयीतून
पाहशी मज हासरी


मी सुरांच्या सोबतीने
तुज मनी नित राहते
सागरासम तू अथांग नि
प्रीतसरिता मी वाहते

भान ना उरते कधीही
बस तुझी होते प्रिया
लोचनांना झाकताना
रूप सुन्दर सत्क्रिया

अंग अंगा छेडताती
सूर वेणूचे तुझे
रोमहर्षी अंग फुलते
रंग मी लिंपू तुझे

सांग तू कैसे जगावे
जागलेल्या भावना
कोणते नाते हे आपुले
कोणत्या ऋणबंधना

दि.२७/०८/२०२४
सकाळी ०६.४३ वा.
गोपाळकाला, दहीहंडी उत्सव



## (३९)
## ती शुभांगी पुष्पिका

पाहिले का गोड गुलाबी
हासणे फुलराण्यांचे
लीला परमेशाची लीली
सूर कोमल गाण्यांचे


अंग अंग कोमलांगी
ती शुभांगी पुष्पिका
कोष भरले मार्दवाचे
राहते पहा खुश ती का

एक सानू झुळुक येता
डोलते ती बोलते
आत दडल्या मूक भावा
जाणते कुणी खोल ते

उमलुनी जगणे कितीसे
सुकणे आहे ठरलेले
तरीही फुलवीत निज मनाला
सुमन अंगणी उरलेले

रंग स्पर्श नि गंध सारे
ओळखीचे वाटते
सौख्य वेडे त्या फुलांच्या
सुरभीतुन मज भेटते

दि.०१/०९/२०२४
सकाळी ०९.३८ वा.



## (४०)
## कमल ताटव्यांच्या गुलाबी

कमल ताटव्यांच्या गुलाबी
रंगी रंगून जावे ना
कमला वसते कमलकांताच्या
चरणी का पहावे ना

पंकी उमलून किंचितही ना
पंक चिकटे कमलदली
जळीच जगणे तरी अलिप्त
जळविहीना पाकळी

दूर ते कोठे फुलावे
रम्य सरोवर देखणे
चांदण्या रंगात न्हाऊन
भुईशी कुणी त्या रेखणे

अर्चनी वा पूजनी मग
पद्मिनीच्या शोभती
उमलता का सम्पदा ह्या
रोज सुंदर लाभती

वाट वेडी एकटी जी
कुमुदिनीसवे मोहवी
नित्य राहो ईश्वरी ती
लक्ष्मी मजसी गो हवी

दि.०२/०९/२०२४
सकाळी ०८.५३ वा.



## (४१)
## वर्षाराणीचे चित्र मोहक

पाऊस भरल्या आभाळाला
सपान रंगीत पडलं
भुईवर लाजून फुलाफुलांचं
गोड गुपित हे घडलं

उमलून आल्या कळ्या कोवळ्या
रंग अंगात भरले
लाल, गुलाबी, शुभ्र नि पिवळे
पोपटी गाणे उरले

एक एकटा वृक्ष पठारी
साक्षी होत डवरला
पानोपानी त्याच्याही मग
उत्साह किती हो भरला

अंथरलेली दुशाल मऊ ती
कुसुम पायघडी होते
स्पर्श मुलायम नेत्रसुखाची
अजोड मनघडी होते

आभाळाचे बरस बरसणे
कलिका लतांचे झुलणे
सुरभीनेही मंदमंदसे
आसमंतास भुलणे

नयनांमध्ये जरा भरावे
थेंब दवाचे लोभस
चित्र असे का कुणी काढले
वर्षाराणीचे मोहक

दि.०४/०९/२०२४
सकाळी ०९.५४ वा.



## (४२)
## हात कुणाचे स्वर्णिम झाले असतील

कांचनाचे ऊन पडले
पिवळाईची जादू
पीतसळी खुले पालवी
खुले जरासे वागू

बघा तृणाने पीतांबर हे
अंगावर ओढले
कुणी अंबरी किरण सोनेरी
सूर्याचे तोडले

तरुवर बसला धम्मक पिवळा
साज फुलांचा लेऊन
त्यावर अंगी शेला ओढला
रेशीम पिवळी घेऊन

कशिदाकारी कुणी काढली
पिवळ्या धाग्यांमधली
हात उन्हाचे विणकर होती
सुवर्ण धरित्री इथली

असे वाटते हात कुणाचे
स्वर्णिम झाले असतील
पराग होऊन झरतील जेंव्हा
सुमने पिवळी दिसतील

दि.०६/०९/२०२४
रात्री १०.५७ वा.



## (४३)
## हिंदोळ्यावर कधी सुखाच्या

कुठून आणीशी रंग कोवळे
पोत कोवळी लाली
नवीच येते जन्माला ही
पल्लव नवी नवाली

रेखा त्यावर स्पष्ट उमटती
नसा नसातून रस तो
वाटे भविष्याचे हे मोहक
चित्र रेखितो सरस तो

इवल्या इवल्या पानांवरती
भार भराचा असतो
ऋतू सांडती येती जाती
तरु बहराचा असतो

पुन्हा पहावे वाटे कधी जर
रूप कोवळे तान्हे
शक्यच नाही कधीही असे का
काळ न मागे जाणे

पुढे पुढे ते केवळ पुढती
मुकाट चालत रहाणे
जे जे आहे रेखांकित ते
भाळी भोगत जाणे

हिंदोळ्यावर कधी सुखाच्या
दुःख हेलकावे तर
संचित आपुले गतजन्मीचे
मानून घ्यावे ते तर

दि.१८/०९/२०२४
रात्री ०८.३७ वा.



## (४४)
## गोकर्णाच्या निळ्या जांभळ्या

गोकर्णाच्या निळ्या जांभळ्या
ताज्या तवेल्या फुलांनो
वेलीवरूनी खुडले जाऊन
जरा विसावा फुलांनो

शिवलिंगावर अर्पित होण्या
उत्सुक कोमल काया
नसेल परिमळ तरीही भक्तीचा
सुगंध भरला फाया

कशास तुम्ही हिरमुसता हो
रंग किती देखणा
नसेल गंध परि प्रिय कुणा तुम्ही
स्वये शिवा देख ना

उमलून सारे जीवित व्हावे
सार्थक जर पिंडीवर
जगणे याहून असेल कैसे
सांगा हो अति सुंदर

भूतली येता कैलासाची
सफर तुम्हा लाभते
शिव सान्निध्ये जन्मच नाही
मरण सार्थ लागते

दि.२३/०९/२०२४
सकाळी ०९.२१ वा.



## (४५)
## रंग भरून संगाने

रंग सोनेरी मिसळून गेला
गुलाबी गुलाबातून
फुले पाकळ्या अंथरलेल्या
तुझ्या माझ्या पथातून

चालत जावे हातामध्ये
हात तुझे घेताना
स्पर्श जिव्हाळा हर्ष किती ते
दिलासेच देताना

कधी वाटते गाल गुलाबी
तुझे कुणी रंगवले
मलाच त्या तव कपोलातुनी
कुणी सांग दंगवले

ओष्ठ तुझे ते जणू पाकळ्या
कोमल मऊ सुमनाच्या
तुझ्या भावना टिपून घेईन
प्रीत भरल्या मनाच्या

आलीस माझ्या जीवनी सखे
रंग भरून संगाने
सांजही येते तुझ्या प्रीतीच्या
आठवणी अंगाने

दि.२४/०९/२०२४
सकाळी ०९.२४ वा.



## (४६)
## गुच्छ मोहिनी

गुच्छ फुलांचे म्हणू तुम्हां की
भावभावना मनीच्या
जन्मासंगे अवतरता तुम्ही
खुणा जणू गतजन्मीच्या

रंग धवल कधी रंग निराळे
आकाशाशी भिडणारे
परागतंतू जणू कामना
अवकाशातून उडणारे

बीज कोठले संचित ठरते
भूमिखाली कर्माच्या
फलित होऊनी भोग भोगणे
कर्तव्याच्या धर्माच्या

गतकाळाची भूमी होईल
आधाराला पायाशी
कर्म रेखणे वर्तमान जो
भविष्य घडे आकाशाशी

सारे सारे परस्परांशी
जुळले जातील अफलातून
गुच्छ मोहिनी जीवन ठरतील
सुगंध पसरून मग आतून

दि.२५/०९/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (४७)
## ठेव दे देवा अशी

जांभळ्या रंगतली नटवर
फुले जी लाजरी
आत लेऊन डोलती जणु
रेशमाची की जरी

पारदर्शी मन सुमन हे
हळव्या रंगाचे खरे
कोण सांगे कानी कैसे
ल्यायचे रंगा बरे

बीज मातीतून गढता
अंकुराची उगवणी
सोडता जागा स्वयेची
निर्मिती हो देखणी

बीज जाते अंकुरही तो
रोपटे जाते कुठे
जाते कलिका फूल येते
फूल जाऊन फळ तिथे

जीवनाची वेल लगडे
मोद पुष्पांनी जशी
रंग हवे ते वेगळाले
ठेव दे देवा अशी

दि.२५/१०/२०२४
रात्री १०.२८ वा.



## (४८)
## गाव तोच रेखावा

आठवणींच्या हिंदोळ्यावर
झुलते मन माझे
कुठे राहते कुणास तगाउक
ना सोबत तनमन माझे

तिथल्या डॉगर दऱ्या दुशालीत
हिरवाईच्या दंग
एक मनाला चढत जातसे
उत्साहाचा रंग

वाट मोकळी जराजराशी
ओली ती हो चिंब
माणसातल्या माणुसकीतून
निखळ मनाचे बिंब

सान झोपड्या अथवा राहोट्या
कुट्या काड्याकुड्यांच्या
आनंदातून डोलत जातील
तृषा कधी न माड्यांच्या

परतून आले शरीर तिथुनी
काळीज परतत नाही
थोडेही त्या सृष्टीमधुनी
वेडे सरकत नाही

जणु राहतो खोल तळाशी
हृदयाच्या देखावा
जरी एकटी मनात माझ्या
गाव तोच रेखावा

दि.१०/११/२०२४
सकाळी १०.०४ वा.



**(४९)**

**हातातल्या गुलाबाने**

हातातल्या गुलाबाने
मोगऱ्याला खुणावले
गंधाने धुंद वारे
परिमळ दुणावले

तिच्या केशकलापात
गजऱ्याची वीण
गुलाबाची खोवण
ती रूपगर्विण

कपोलांचे स्पर्श तिच्या
जणू पाकळ्या
उमलून सहवासी
तिच्या येती कळ्या

गाणे कुणीतरी गाते
धुंद धुंद सूर
तिच्या ओढीलागी
माझ्या हृदयाला पूर

रंग तिचा गोरा गोरा
अंग चंदनाचे
गुलाबाचे स्पर्श तिचे
गीत स्पंदनांचे

सांगा तिला कुणीतरी
झुरतो मी इथे
देह मजजवळी परी
मन तिच्या तिथे

दि.१३/११/२०२४
रात्री ११.३४ वा.



## (५०)
## सुंदर जीवन सुंदर लोचने

आकाशातील रंग मोहिनी
उतरून येते जेव्हा भूवरी
जलाशयातील प्रतिबिंबाने
मोहित होते तीच तियेवरी


मीच आहे का इतकी माधुरी
मीच सुंदरी प्रश्न पडे
तिच्या भोवती गोड गोडुले
फिरते कोडे असेच घडे

उमलून आल्या कळ्या हासल्या
पाकळ्यात निज खळ्या पहा
आणि परागांच्या सुरभीने
सुगंध वेडा करी अहा !

जळात उठती नाजूक लाटा
भेटून वाटा शोधू जरा
वृक्ष डोलतो आनंदाचा
मधोमध जीवनी खरा

त्या मेघांच्या मालेवरती
आशा आकांक्षा राहती
सुंदर जीवन सुंदर लोचने
चित्र सुखाचे जे पाहती

दि.१७/११/२०२४
रात्री ११.५३ वा.



## (५१)
## मोहित वेळ ही करते

पहाट होता मनात जागे
नव्या युगाची आशा
दिवस वेगळा नव्या दमाचा
नवी प्राचीवर उषा

आकाशातील रंग सांगती
काहीतरी नव्याने
खगही सुंदर घेत भराऱ्या
किलबिल गाती गाणे

दिनकर येतो उगवून आता
लाल केशरी थोडा
दौडत जाईल त्याच्यासंगे
दिवसरूपी हा घोडा

पानाफुलांना जागवून ही
सकाळ तरतरी देते
उठा उठा हो सकळिक आता
जगणे नवे ती देते

कसे सांगावे हवेत अत्तर
कोण सकाळी भरते
सुगंध नाना भुलवुनी मना
मोहित वेळ ही करते
मोहित वेळ ही करते

दि. २०/११/२०२४
सकाळी ०६.३९ वा.



## (५२)
## जगणे असेच चाले

सागर सुंदर नभ हे मनोहर
रम्य तरुवर राजी
मोहित करती शांत सावल्या
निळीशार रंगराजी

शुभ्र वालुका मेघही ढवळे
एकमेकी मिसळले
गडद निळे अन फिके आकाशी
हिरवे रंग हे सगळे

दूर चालती नौका काही
आपुल्या धुंदीत
कुठे त्या ठाऊक आहेत वेड्या
जीवन बंदीत

जोवर येतील हलक्या झुळुका
तोवर प्रवास सुखकर
जशी वादळे देती तडाखे
मन हो वेडे दुखकर

जगून घ्यावे आयुष्याचे
क्षण सुंदर जे आले
येऱ्या झाऱ्या चालू द्याव्या
जगणे असेच चाले

दि.२२/११/२०२४
रात्री १०.४५ वा.



(५३)
## जगणे सुंदर व्हावे

असतील नसतील रसिक कुणी कुठे
आम्ही उमलतो आमुचे
हसणे, फुलणे, गंध उधळणे
चाले आमुचे आमुचे


रंग कोणते कुणा लाभतील
द्वेष ना येतो सुमनी
संग केवढा सुंदर असतो
हर्ष उफाळे उन्मनी

हलक्या हलक्या येतील झुळुका
डोलून द्यावे अंग
गाणे गाईल वारा जेंव्हा
हळूच व्हावे दंग

कुठे पोचणे की इथेच सुकणे
कुणा न माहीत काही
तरीही चिंता मनास वेड्या
सतावीत त्या नाहीत

हासून घ्यावे मनमोकळे
डोलून बोलून घ्यावे
जगण्यासाठी काय हवे मग
जगणे सुंदर व्हावे
ऐसे जगणे सुंदर व्हावे

दि.२७/११/२०२४
रात्री १०.४९ वा.



## (५४)
## इथे विसावती कला

मेघ पांघरले कुणी
नग कळस दिसेना
नभ गुडूप झाले हो
कुणा कुठे गवसेना

कुणी हिरवी पोपटी
सांगा दुलई घेतली
आत दडून कुणी हो
पाचू माळ ती वेचली

तरुवर एकटाच
उभा शांत नि निवांत
त्याची सावली खेळते
ऊन सावल्यांचे भ्रांत

इथे गुंजते कुणाचे
फक्त एकाऽऽकीपण
नसे आवाज रवाचा
मूर्त एऽऽक टाकीपण

इथे विसावती कला
इथे चित्र रंगतात
रसिकांसवे नित
कलाकार दंगतात

दि.०१/१२/२०२४
सकाळी ०८.५७ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.** **(https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/ सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु (रंग), यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(मिश्र कविता) - कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, (रंग) - कृष्णकांत, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utm_source=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान<br>- डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी<br>यांचा जागतिक काव्य विक्रम<br>केल्याबद्दल राज्यपालांच्या<br>हस्ते सत्कार 'साहित्यिक व<br>संतांनी देश एकसूत्रात बांधला'<br>भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ९६
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ७
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●